**आदेश**

क्र.कावि/कक्ष७:२/प्रअभूसं/न.क्र.१०२/कावि-/१५८० /१९ १६५२
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- १५ / ०५ / २०१९

विषय :- भूसंपादन प्रकरण क्रमांक १७/२००८-०९ मौजे दादगांव ता. नांदुरा जि.बुलडाणा मध्ये प्रारुप निवाडयास मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भः- विशेष भूसंपादन अधिकारी कं.क्र.१ जिगांव प्रकल्प बुलडाणा यांचे पत्र क्र. कावि/विभुअ/अका/५३३/२०१९ दिनांक १५/०५/२०१९.

*****

*****

ज्या अर्थी विशेष भूसंपादन अधिकारी कं.क्र.१ जिगांव प्रकल्प बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक भूसंपादन प्रकरण क्रमांक १७/२००८-०९ मौजे दादगांव ता. नांदुरा जि.बुलडाणा मध्ये प्रारुप निवाडयास मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रकरणात विशेष भूसंपादन अधिकारी कं.क्र.१ जिगांव प्रकल्प बुलडाणा यांना यंत्रणेने निर्देशीत केल्यानुसार प्रारुप निवाडा मंजुरी व प्रसिध्दीसाठी मुदतवाढ घेणे आवश्यकआहे. करीता सदर प्रकरणात निवाडा मंजुरी व प्रसिध्दीसाठी १ वर्षाची मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम २५ मध्ये परंतु,त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय, लेखी स्वरुपात नोदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल.
टिपः- या कलमामध्ये, निवाडा देण्याच्या कालावधीसंबंधी तरतुद केलेली आहे. कलम १९ अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासुन १२ महिन्याच्या आत, जिल्हाधिकारी यांनी निवाडा दिला नाही तर, जमिन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल, तसेच समर्थनीय परिस्थितीत १२ महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार समुचित शासनाला असून कालावधी वाढविण्याचा असा निर्णय नोंदविणे व प्रसिध्द करणे आवश्यक आहे. अशी तरतुद केली आहे.

त्याअर्थी भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम २५ नुसार भुसंपादन प्रकरण क्रमांक १७/२००८-०९ मौजे दादगांव ता. नांदुरा जि.बुलडाणा या प्रकरणात प्रारुप निवाडा करण्यास १ वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे.

(डॉ.निरुपमा डांगे)
**जिल्हाधिकारी बुलडाणा**